दिनांक २५/०७/२०१८

प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिट | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | श्री. सुरेश लक्ष्मण गोरे, वय ३६, पोलीस नाईक ब.नं. २९२, नेमणूक गुहागर पोलीस ठाणे, ता. गुहागर, जि. रत्नागिरी |
| घटनेचे ठिकाण | गुहागर पोलीस ठाणे बाहेरील गुहागर ते अंजनवेल जाणारे रोडवर देवघाट येथील गणपती मंदीराजवळ |
| मागितलेली लाचेची रक्कम | १०,०००/- रुपये |
| तडजोडीअंती मागितलेली लाचेची रक्कम | ९,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ६,०००/- रुपये (पहीला हप्ता) |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांच्या मुलाविरुध्द एका मुलीने तिचे नाव घेऊन गाडीचा हॉर्न वाजवल्याबाबत व छुपा पाठलाग करण्यावरुन पोलीस नाईक सुरेश गोरे यांचेकडे तक्रार केली होती. त्याप्रमाणे पोलीस नाईक सुरेश लक्ष्मण गोरे हे तक्रारदार यांचेकडे मुलाविरुध्द गुन्हा दाखल न करणेकरीता तसेच लॉकअपमध्ये न ठेवण्यासाठी १०,०००/-रुपये लाचेची मागणी करत असलेबाबत त्यांनी दिनांक २४/०७/२०१८ रोजी तक्रार दिलेली आहे.<br>सदर तक्रारीची दिनांक २५/०७/२०१८ रोजी पडताळणी केली असता, पोलीस नाईक सुरेश गोरे यांनी तक्रारदार यांचे मुलाविरुध्द गुन्हा दाखल करुन लॉकअपमध्ये न ठेवण्याकरीता तडजोडीअंती ९,०००/- रुपये लाचेची मागणी करुन पहीला हप्ता ६,०००/-रुपये घेवुन येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.<br>पडताळणीनुसार लाचलीचा सापळा आयोजित केला असता, लोकसेवक पोलीस नाईक सुरेश गोरे, नेमणुक गुहागर पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मुलाविरुध्द गुन्हा दाखल करुन लॉकअपमध्ये न ठेवण्याकरीता पहीला हप्ता ६,०००/-रुपये लाचेची रक्कम गुहागर पोलीस ठाण्याचे बाहेर गुहागर ते अंजनवेल जाणारे रोडवर देवघाट येथील गणपती मंदीराजवळ स्विकारली व ते पुन्हा तक्रारदार यांचेसोबत गुहागर पोलीस ठाण्यात परत आले असता पोलीस नाईक सुरेश गोरे यांना गुहागर पोलीस ठाणे येथील लॉकअप गार्ड समोरील मोकळ्या जागेत १२.४७ वाजता पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमांकावर संपर्क साधावा।

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

(राजेंद्र सानपाडे)
पोलीस उप अधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी